मोटार वाहन विभागातील कंत्राटी वाहन
चालकांच्या वेतनाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह (परिवहन) विभाग**
शासन निर्णय क्र.मोवावा-०११३/प्र.क्र.०२/परि-४
२ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ मे, २०१६.

**वाचा** : १) शासन निर्णय क्र.एमव्हीडी-१२०९/प्र.क्र.३३२/परि-४, दि.३०/०३/२०१०.
२) शासन पत्र क्र. एमव्हीडी-१२०९/प्र.क्र.३३२/परि-४, दि.०४/०९/२०१०.
३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग अधिसूचना क्र.किवेअ ३२०१०/सीआर-१२८१/काम-७, दि.२०/०७/२०१०.

**प्रस्तावना** : मोटार वाहन विभागासाठी नवीन वाहने खरेदी करण्यास व कंत्राटी पध्दतीने वाहन चालक नियुक्त करण्यास संदर्भीय दि.३०/०३/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संदर्भीय दि.०४/०९/२०१० रोजीच्या शासन पत्रान्वये कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या वाहन चालकांना नियुक्ती देण्यासाठी मानधन व अटी / शर्ती विहीत करण्यात आल्या आहेत. सदर कंत्राटी वाहन चालकांच्या वेतनात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : मोटार वाहन विभागातील कंत्राटी वाहन चालकांना उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या संदर्भीय दि.२०/०७/२०१० रोजीच्या अधिसूचनेन्वये निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार म्हणजे परिमंडळ-१ मधील कंत्राटी वाहन चालकांना रु.५,५००/- व उर्वरित क्षेत्रातील कंत्राटी वाहन चालकांना रु.५,३००/- अधिक वेळोवेळी अनुज्ञेय विशेष भत्ता याप्रमाणे दरमहा वेतन दि.०१/०६/२०१६ पासून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या कंत्राटी वाहन चालकांना संदर्भीय दि.२०/०७/२०१० रोजीची अधिसूचना लागू झाल्यापासून देय असलेले किमान वेतन व प्रत्यक्ष दिलेली रक्कम यातील दि.३१/०५/२०१६ पर्यंतची थकबाकी देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१७६/व्यय-८, दि.२४/०५/२०१६ अन्वये प्राप्त अभिप्रायास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विजय लिटे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**
महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा ) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालये. (परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत)
वित्त विभाग (व्यय-८), मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, परिवहन ४.